# विद्यार्थ्यांनी योग करणे आवश्यक

## महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांचा सल्ला


वडाळा : योग केंद्राचे उद्‌घाटन करताना महापौर विश्वनाथ महाडेश्वर.

वडाळा, ता. २१ (बातमीदार) : योग हे आपल्या आरोग्यासाठीचे उत्तम औषध आहे. त्यामुळे सर्वांनी रोज योगा करणे आवश्यक आहे, असा सल्ला महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांनी विद्यार्थ्यांना दिला. विद्यार्थ्यांचे सुरक्षित आरोग्य, तसेच त्यांच्या मनावरील ताण कमी करण्यासाठी शीव येथील पद्मभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठान अभियांत्रिकी महाविद्यालयात योग प्रशिक्षण केंद्र, ओपन जिमखाना व फिटनेस सेंटर उभारले आहे. योग दिनाचे औचित्य साधून बुधवारी महापौर विश्वनाथ महाडेश्वर व मुंबई विद्यापीठ कुलसचिव डॉ. एम. ए. खान यांच्या हस्ते सेंटरचे उद्‌घाटन केले.

आत्मा आणि परमात्मा यांचा एकमेकांशी अतूट संबंध आहे आणि त्यांना जोडणारा दुवा म्हणजेच योग होय. योग हे आपल्या आरोग्यासाठीचे उत्तम औषध आहे, असा सल्ला महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांनी विद्यार्थ्यांना दिला. या वेळी नगरसेविका सान्वी तांडेल, माजी नगरसेवक मंगेश बनसोड, योगगुरू नीरज सिंग व महाविद्यालयाचे महासचिव ॲड्. आप्पासाहेब देसाई आदी उपस्थित होते.